# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२०९ | दिनांक-३०/०५/२०२४

## वाहन चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास शिताफीने पकडुन त्याचेकडुन ६ गुन्हयांची उकल करण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे परिसरात गेल्या काही महिन्यापासुन वाहन चोरीच्या गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवून आरोपीतांचा शोध घेवून पायबंद करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

**हकिगत :-**

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १७४/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी श्री रतीश उन्नी मेनन, वय-४० वर्षे, रा. रुम नं- ए/२०१, आनंतराज अपार्टमेंट, मिर्च मसाला अपार्टमेंट जवळ, अंबाडी रोड, वसई प. ता. वसई, जि. पालघर याने त्यांची ५,०००/-रु. किं.ची के- टेक कंपनीची बॉक्सर सिटी डिलक्स, मरुन रंगाची दुचाकी मोटार सायकल तिचा क्रमांक MH/04/ BJ/7960 ही १८/०५/२०२४ रोजी दुपारी १५.०० वा ते सायंकाळी १७.०० वा. चे. सु. आनंतराज अपार्टमेंट, बिल्डींगचे बाहेर रोडवर, मिर्च मसाला अपार्टमेंट जवळ,अंबाडी रोड वसई प. येथे रस्त्याच्या कडेला उघडयावर पार्क करुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या संमत्तीशिवाय स्वतःचे फायद्याकरिता चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दि. २३/०५/२०२४ रोजी ११.५७ वा फिर्याद दिल्यावरुन सदरचा गुन्हा नोंद आहे.

**गुन्हयाची उकल :-**

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान गुन्हयाचे घटनास्थळी तात्काळ भेट देवून युनिटचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन गुन्हयाचे घटनास्थळ व आजुबाजुचे परिक्षण करीत असताना गुन्हयातील आरोपीत हा चोरीस गेलेली मोटार सायकल ही ढकलत घेवून जात असताना दिसून आला. सदर आरोपीताचे फुटेजचा सलग ३ दिवस सातत्याने माग काढत शोध घेतला. सदर आरोपीताचे प्राप्त फुटेजवरुन गोपनीय बातमीदाराकरवी माहीती घेवून आरोपीत यास विरार पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील गुन्हा रजि नं २४७/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे या गुन्हयातील ॲक्टीव्हा ३ जी मोटर सायकल क्र. एम एच ४८ ए.डी ३३२९ हि चालवीत नेत असताना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपीत याचेकडे केलेल्या तपासातुन सदर आरोपीत हा चोरी केलेल्या मोटार सायकली खोलून त्या ग्राईंडर मशिनने तुकडे करुन भंगारामध्ये विक्री करीत असल्याची त्याची गुन्हे कार्यप्रणाली दिसुन आली. आरोपीने मोटार सायकली चोरुन ग्राईंडर मशीनने तोडल्यानंतर ते पार्ट भंगार विक्रेत्याकडे विक्री करीता नेल्यावर भंगार दुकानदार यास ते चोरीचे असल्याची पुरेपुर जाण असतानाही त्याने ते खरेदी करुन त्या पार्टची विल्हेवाट लावणेकरीता इतर भंगार दुकानदार यांना विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर भंगार दुकानदार यास चोरीचा माल खरेदी केला व त्याची विल्हेवाट लावली या कलमाखाली त्यास अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन खालील मोटार सायकलचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची नावे :-**

१) जहीर जमिल खान वय २१ वर्ष रा. जोगी चॉल, आयशा मशिद, नवजीवन, नालासोपारा पुर्व

२) हेमंत उर्फ हेमंतकुमार हेमचंद जैन रा. ए/५०४ जय नगर, विजय नगर, वालीव, ता. वसई, जि. पालघर

**<u>उघडकीस आलेले गुन्हे :-</u>**

| अक्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर | १७४/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| २. | माणिकपुर | १७६/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | वालीव | २८४/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | वालीव | २४५/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | वालीव | २८३/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ६. | विरार | २४७/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

नमुद अटक आरोपीत यांचेकडुन उघडकीस आलेल्या ६ गुन्हयांत चोरलेल्या ६ मोटार सायकलींपैकी १ मोटार सायकल व ५ मोटार सायकलींचे तुकडे करुन भंगारात विक्री केलेले पार्ट असा एकुण १,५०,०००/- रुपयेचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयांतील आरोपीत यांची मा. प्रथमवर्ग न्यायालय सो. वसई कोर्टातुन पोलीस कोठडी रिमांड मंजुर करुन सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -२ वसई हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/ सागर प्रकाश शिंदे, सहाफौज/ रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/ ०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./०५०३३ जगदीश गोवारी, पोहवा/ ०६१०७ रमेश आलदर, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, पोशि/२३९४२ प्रतिक गोडगे, पोशि/२३३०३ राजकुमार गायकवाड, पोशि/२३३९३ अजित मैड, मसुब/रामेश्वर केकान यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे

